म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३५३

# आम्ही कुणीही नाही



१ १ क्ष य ज्ञ ० ०

REFBK-0022360
REFBK-0022360

रमेश पानसे

रमेश पानसे

# आम्ही कुणीही नाही

REFBK-0022360
REFBK-0022360

श्री० वामनराव देशपांडे यांस आदरपूर्वक

# नेते हो !

नेते हो !
अर्धं आयुष्य असंच संपलं
आता तरी जगावं म्हणतोय
तुमची हरकत नसेल तर.
पंचवीस वर्षं स्वातंत्र्याची
आमच्या पिढीची अशीच गेलीत
बेचव आणि अवलंबून तुमच्यावर.
आशा होती मुंबईच्या लोकलगाडीत
चढता-उतरताना आम्हांला पाहून
तुमच्या मऊशार बिछान्याला एखादी सुरकुती पडेल.
वाटत होतं, तिकिटाच्या लांब रांगा पाहून
गुळगुळीत रस्त्यांवरून सळाळत जाणाऱ्या गाडीत
टायरखाली एखादा खडा सापडेल.
असंही आम्ही मानलं होतं :
'नेते' म्हणून तुमचा जन्म
आमच्या मतांच्या पोटी झाला आहे.
एखाद्या सणाला तरी जन्मदात्याची कदर राखली जाईल.
पण या लोकशाही बाळंतपणात
बापाचं नाव लावत नाहीत
हे कळायला पंचवीस वर्षांनी प्रौढ व्हावं लागलं.
पिळवणुकीचं स्तन्य भरपूर प्यालेले तुम्ही
नेते हो !
तुमच्या रेताड मनांवरून दैन्याचं पाणी
असंच वाहून जाणार आहे
स्वातंत्र्याची आणखी एकशे पंचवीस वर्षं.

ऑगस्ट, ७२

# आमदार होता येते!

नेता : एक महाभयानक राक्षस. आपल्या अधिकारी हातांनी
समुदायाचे जीवन आवळण्याची ईर्षा धरणारा.
या राक्षसाचे पोट कितीही खाल्ले तरी भरत नाही.
याच्या दयार्द्र हातात लाचेखेरीज दुसरे काही टिकत नाही.
याच्या मुर्दाडमत्त चेहऱ्यावरील हसू
गठ्ठ्यागठ्ठ्याने मते मिळवू शकते.
(निरर्थक मतांतून सामर्थ्य उभारण्याची किमया करून
दाखविणारा एक देश म्हणून आमची ख्याती आहे.)
मतपेटीच्या परमेश्वराने याला
दीर्घायुष्याचे वरदान केव्हाच देऊन ठेवले आहे.
आता फक्त याच्या सामर्थ्यलीला पाहून
त्याची पूजा करण्यात आयुष्य वेचले पाहिजे.
वेळप्रसंगी त्याच्या आनंदासाठी आपण प्राणही देऊ या—
म्हणतात,
असे केल्याने पुढील जन्मी आमदार होता येते.

सप्टेंबर, ७४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२३६० दा. क्र. का१०५ २३५३
शाखा (स्थळ प्रत)

## उद्या उगवताना

हे सूर्यदेवा,
कंटाळा आला आता तुमच्या एकचक्री चालीचा.
पूर्व-पश्चिम थकल्या आता तुमच्या किरणांची देवघेव करून.
दहांपैकी आठांना आराम देऊन
दोघींनाच कामाला लावण्याची
तुमची अ-समाजवादी कृती बदलण्याची वेळ आता आली आहे.
इतक्या वर्षांच्या भारताच्या भ्रमंतीवरून
हे तुमच्या लक्षात आलेच असेल
की हा देश आता बदलला आहे.
तुमच्यासारख्या सरळ चालीच्या लोकांनी
चाल बदलून चालायची आता वेळ आलेली आहे.
म्हणून म्हणतो,
पूर्व-पश्चिम खिडक्या असणाऱ्या भाग्यवान घरांनाच
प्रकाश पुरविण्याची
तुमची अ-समाजवादी कृती बदलण्याची वेळ आता आली आहे.
शिवाय इथे आता लोकशाही प्रस्थापित झाली असल्याचे
तुमच्या लक्षात आलेले असेलच.
त्यामुळे तुम्ही आता तुमच्या मताने चालू नका.
तुम्ही कसे वागावे हे, लोकमताचा कौल घेऊन, आम्ही ठरवू
आणि लोकसभेत एक बिल पास करून टाकू.
लक्षात ठेवा,
तुमची गती काही वेगळीच दिसली
तर राष्ट्रपतींचा वटहुकूम जारी करू.
तसे तुमच्यावर आरोप बरेच आहेत.
तुम्ही उगवता म्हणून
अनेकांचे अनेक व्यवहार उजेडात येतात.
इतकी वर्षे आमच्या भोवती फिरून

निदान हे तरी तुमच्या लक्षात यायला हवे होते की
अंधारातले कोणते व्यवहार केव्हा उजेडात आणायचे
हे आधी ठरवावे लागते.
ज्यांना पकडायचे त्यांना
आधी तसे कळवावे लागते.
किती शिक्षा त्यांना द्यायची, शिक्षेत किती सूट द्यायची,
शिक्षा भोगण्याच्या बदल्यात किती रक्कम घरी पोचवायची
या साऱ्या गोष्टी आगाऊ ठरवाव्या लागतात.
या देशातील कमिटेड ज्युडिशियरीचे वाहते वारे
तुमच्यावरून केव्हातरी वाहत गेलेच पाहिजे.
तुमच्यावर आणखीही एक आरोप आहे.
तुम्ही बुद्धिमंतांच्या कारवायांकडे डोळेझाक करायला
अंधाराला सवड देता,
आणि टीकेचे शीड फडकवत विरोधी पक्ष वावटळ उठवतात.
तसे या देशाला बुद्धिमान लोकांचे मुळीच वावडे नाही.
बुद्धिमान लोकांना मते देता येतात; निवडणुकीत.
त्यांना मते व्यक्तही करता येतात; सल्लागार मंडळांवरून
किंवा मंत्र्यांची भाषणे लिहून.
जे हे करीत नाहीत ते बुद्धिमान नसतात
असे मानण्यास वाव आहे.
हे सूर्यदेवा,
दिवसरात्र आपल्यामुळे होतात असे मानण्याचाही
फार मोठा अपराध तुम्ही केलेला आहे.
वास्तविक या देशात तुम्ही हे शिकायला हवे
की, दिवस की रात्र हे ठरविण्याचा अधिकार
लोकप्रतिनिधींचा असतो.
त्यांनी कोणत्या बाजूने मतदान करावे
हे ठरविण्याचा अधिकार मंत्र्यांचा असतो.
मंत्र्यांनी मंत्री व्हायचे किंवा नाही
हे ठरविण्याचा अधिकार पंतप्रधानांचा असतो.

म्हणून म्हणतो, हे सूर्यदेवा,
उद्या उगवताना पंतप्रधानांच्या परवानगीने उगवावे हे बरे!
कारण तुमच्या आणि आमच्या महान देशाचा
तो सूर्य आहे.

नोव्हेंबर, ७४

## या म्हाताऱ्या देशातील

या म्हाताऱ्या देशातील तळपणारे जुने दिवे
विझवल्याशिवाय चमकणार नाहीत नवे काजवे.
तुमचे जरा राहू द्या
आम्हालाही जग पाहू द्या.
वाटते आहे या देशाला आपणही काही द्यावे.
तुमच्या हातातील मशाली
थोडा वेळ ठेवा खाली
आमच्याही रस्त्यांवर ज्वालांचे असतील थवे.
बाळपण तुम्हीच पोसले
तारुण्य तुम्हीच ठरवले
आम्हाला आमचे पाहू द्या काय नको काय हवे
आता तरी एक करा
ऋणी राहील वसुंधरा
तुम्ही पेरल्या पापांचे पीक तुम्ही काढून न्यावे
भूमीलाही आता इथल्या नव्या हातांचे दान हवे.

डिसेंबर, ७४

## मुंग्यांप्रमाणे

हे परमेश्वरा,
मला मुंग्यांप्रमाणे जगण्याचे सामर्थ्य दे. मुंग्यांप्रमाणे जगण्याचे. मुंग्यांप्रमाणे.
म्हणजे मग राणीमुंगीच्या मागोमाग मुक्याने चालणे हा माझा शरीरधर्मच असेल.
परमेश्वरा, स्वतंत्र चालीने चालण्याच्या वेडाची पिसे एकदा छाटलीच पाहिजेत;
कारण प्रत्येक पावलागणिक बोलण्याची उबळ येते हे एकंदरीत या देशात बरे नाही.
दयाघना, तुझ्या कृपाप्रसादाने मुंग्यांप्रमाणे जगण्याची किमया प्राप्त झाली म्हणजे
राणीमुंगीने आमच्या हितासाठीच प्राण पणाला लावले आहेत हे मला पटेल.
राणीलाही बरे वाटेल. आणि राष्ट्रहिताच्या मार्गातील अडचणींना डूब मिळेल.
शिवाय क्यू लावण्याचा स्वाभाविक गुण माझ्यात उतरेल मी मुंगी झाल्याने.
परमेश्वरा, मला मुंग्यांप्रमाणे जगण्याचे सामर्थ्य दे. मुंग्यांप्रमाणे जगण्याचे. मुग्यांप्रमाणे.
म्हणजे तर्क-विचार-भावनांची मानवी लक्तरे उगाचच वागवावी लागणार नाहीत.
आम्ही विचार करतो म्हणून वावगे वागतो; तर आता विचारच असणार नाही.
भावना उचंबळून येतात, राहवत नाही; तर आता भावनाच राहणार नाही.
परमेश्वरा, या गोष्टींचा एकदा न्याय्यतेने विचार तुला केलाच पाहिजे की असे
मुंग्यांना दिले नाहीस ते मला देण्याचा पक्षपात तुझ्या हातून कसा घडला,
आणि जाणिवेचे आगाऊ इंद्रिय देऊन या भारताच्या पोटी जन्माला का घातला.
म्हणून परमेश्वरा, मला मुंग्यांप्रमाणे जगण्याचे सामर्थ्य दे. आणि हेही लक्षात ठेव,
चावऱ्या मुंग्यांपेक्षाही धावऱ्या मुंग्यांचा स्वभावच मला अधिक मानवेल.
आमेन !

फेब्रुवारी, ७५

# माझ्या महान पितरांनो

माझ्या महान पितरांनो,
तुमचे श्राद्ध मी करणार नाही
मला, तुम्ही पुन्हा या देशात यायला नको आहे.
कारण
तुमच्या वंशजांचे वर्तमान आयुष्य पाहण्याची
वेळ तुमच्यावर येईल.
तुमच्या संभोगांतून निर्माण झालेले दुःखांचे झरे
पुन्हा एकदा तुमच्या डोळे नसलेल्या
नजरेतून वाहत जातील.
कान नसलेल्या तुम्हांला
या भूमीत तुम्ही पेरलेल्या प्राणांचे
फक्त आक्रोशच ऐकू येतील.
इथे निवडुंगासारखे वाढले आहे
फक्त राजकारण;
राजमान्यता असलेले.
तुमच्या काळातील वारशाने प्राप्त झालेली
एकच मालमत्ता आम्ही जपून आहोत—
दारिद्र्याची !
म्हणूनच या महागाईत परवडत नाहीत श्राद्धे.
हे पितरांनो,
तुमच्या जवळपास असेलच
तर परमेश्वराला सांगा,
आम्हांला या देशात जन्माला घालायचेच असेल तर
आम्हांला चटावरचे जीवन द्या
आणि मरण द्या अनंत !

फेब्रुवारी, ७५

# मंत्रीमंडळात बदल

मंत्रीमंडळात बदल झालाच पाहिजे.
दारिद्र्य-निर्मूलनाचा तोच एक
उपलब्ध मार्ग आहे.
उदात्त मार्ग आहे.

मंत्रीमंडळ मोठे असावे
यामुळे अनेकांना श्रीमंत होण्याची संधी मिळते.
मंत्रीमंडळात सर्व प्रदेशांना प्रतिनिधित्व द्यावे
त्याने प्रादेशिक विषमता कमी होण्यास मदत होते.
मंत्रीमंडळात सर्व जाति-धर्मांचे लोक असावेत
अशाने सर्वांना विकासाची समान संधी मिळते.

मंत्रीमंडळात नवे रक्त यावे
असे केल्याने मातीचे प्रश्न सुटतात.
मंत्रीमंडळात नवी नावे यावी
अर्थातच सरकारी नोकरीत नवी माणसे येतील.
दरसाल नवीन मुख्यमंत्री निवडावा
राज्यांतील रस्त्यांना पुरेसे पुतळे मिळू शकतील.

मंत्रीमंडळात बदल झालाच पाहिजे
म्हणजे पक्षही मतसंपन्न बनू शकतो.
मंत्रीमंडळात बदल झालाच पाहिजे
दारिद्र्य-निर्मूलनाचा तोच एक
उपलब्ध मार्ग आहे.
उदात्त मार्ग आहे.

फेब्रुवारी, ७५

## खुर्च्यांच्या किमयेमुळे

ज्या देशाच्या मानेवर खुर्चीचेच भूत असते
त्या देशात
निवडणुका खुर्चीसाठी होतात.
खुर्च्यांच्या नात्याचे लोकच
खुर्चीमुळे नेते होतात.
Chair does no wrong :
खुर्ची कधीच चुकत नसते.
चकत तर नसतेच नसते.
तरीही खुर्चीला चकवू पाहणारा
(त्याच खुर्चीचे स्वप्न पाहत)
विरोधी पक्षाची खुर्ची धरून असतो.
खुर्चीला हात असतात
न हलणारे;
त्यानेच खुर्च्या जग हलवतात.
खुर्चीला पाय असतात
न चालणारे;
त्यानेच खुर्च्या राज्ये चालवतात.
ज्या देशाच्या मानेवर खुर्चीचे भूत असते
तेथील खुर्च्या अढळ असतात.
अढळ असतात म्हणून त्या
सढळही असतात.
आणि मग खुर्च्यांपुढे वाकणारे
खुर्च्यांमुळे ताठ बनतात.
खुर्च्या जादूगारही असतात.
त्या माणसांचे रंग बदलतात,
त्या माणसांचे मन बदलतात.
खुर्च्यांच्या किमयेमुळेच

खुर्च्यांवरील माणसे आपल्यापेक्षा वेगळी दिसतात.
ज्या देशाच्या मानेवर खुर्चीचेच भूत असते
त्या देशाचे भविष्यच
खुर्चीखाली गाडले जाते.

फेब्रुवारी, ७५

# देशाचा हा सुवर्णरथ

हा आमचा महान विजय आहे!
पंचवीसशे वर्षांत साधला नाही असा बदल
केवळ पंचवीस वर्षांत
करू शकला स्वातंत्र्योत्तर भारत!!
हे कसे शक्य झाले?
आश्चर्य करू नका.
आम्ही मागे जाऊन वेद पाहण्यापेक्षा
फक्त पुढील काळाचा वेध घेतला.
त्यातून एक महान तत्त्व उदयास आले
आणि त्यानेच भारताचे भविष्य बदलले.
'खऱ्यापेक्षा बऱ्याची कास धरावी;
क्रांतीचा उगम यातच आहे.'
खरे बोलण्यापेक्षा बरे बोलावे.
खरे वागण्यापेक्षा बरे वागावे.
उदाहरणार्थ,
शिक्षकांनी विद्यार्थ्यांना
खरे मार्क देण्यापेक्षा बरे मार्क द्यावे.
त्यामुळे विद्यार्थ्यांच्या असंतोषाचे मूळच छाटले जाते,
आणि शिक्षणक्षेत्रात शांती नांदते.
न्यायाधीशांनी निकाल देताना
कायदे पाहण्यापेक्षा फायदे पाहावेत समाजाचे,
याने सरकारी धोरणांना हातभार लागून
देशांतर्गत शांतता निर्माण होते.
आमदार-खासदारांना तर शपथ घ्यावी लागते
घटनेवर हात ठेवून
या तत्त्वाचे पालन करण्याची.
त्यामुळे समाजाचे हे सारे महान सेवक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 22360 काव्य 2353
शाखा (स्थळ प्रत)

बरे आणि बरेच बोलत आले आहेत, सातत्याने.
त्यानेच देशाचा हा सुवर्णरथ
प्रगतिपथावर ओढून नेला, वेगाने.

फेब्रुवारी, ७५

## लोकशाही टिकण्यासाठी

लोकहो, या देशात
लोकशाही टिकण्यासाठी
प्राण देण्यास तयार व्हा.
लोकशाही टिकल्यानेच
जगात देश थोर ठरतो.
लोकशाही हेच आमचे स्वप्न होते
लोकशाही हेच आमचे ध्येय ठरते.
स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांना
लोकशाहीच्याच होत्या कळा.
भारताच्या या भव्य भाळी
लोकशाहीचाच लाल टिळा.

लोकहो, या देशात
लोकशाहीची असेल चाड
तर संप करू नका.
लोकशाहीची असेल लाज
तर विरोध करू नका.
लोकहो, खरे बोलाल तर
लोकशाही गळून पडेल
राजधानीत मोर्चा निघेल तर
लोकशाही दुःखे रडेल.
लोकहो, लोकशाही टिकल्यानेच
आपल्या जगण्यास अर्थ आहे.
लोकशाही नसेल तर
नेते होणे व्यर्थ आहे.
तुम्ही बुडला तरी चालेल
लोकनेते तरले पाहिजेत;

तुम्ही मेलात तरी चालेल
लोकशाही जगली पाहिजे.

मार्च, ७५

## गरज नाही इथून पुढे

"गरज नाही इथून पुढे या देशाला
विद्वानांची, शिक्षणतज्ज्ञांची.
एवढेच कार्य आहे ना,
देशाचे तारू मोक्षाच्या पैलतीरी पोचविण्याचे?
आम्ही त्याला समर्थ आहोत
राजकारणी लोक!"
विद्वानांना अभ्यास करावा लागतो
योग्य-अयोग्य, चांगले-वाईट ठरविण्यासाठी;
राजकारण्यांना हे ज्ञान उपजतच असते.
विद्वान आधी चर्चा करतात;
राजकारणी निष्कर्ष काढतात त्याअगोदरच.
विद्वानांना वेळ लागतो निर्णय घ्यायला;
राजकारण्यांना विलंब चालत नाही देशकार्यात.
यासाठीच आता देशोद्धाराची जबाबदारी
राजकारण्यांनी घेतली आहे शुभ्र शिरांवर!
त्यांचे मार्ग मूलतःच भिन्न आहेत...
त्यांच्या ओठांवर हसू असते
समाजाच्या काळजीने.
त्यांच्या हातांत दंडुका असतो
लोकशाहीच्या रक्षणासाठी.
त्यांच्या अंगावर खादी असते
गादीला शोभेशी.
राजकारणी, अर्थातच, समाजाच्या मताने चालतात.
हे मतही ते फक्त एकदाच घेतात...
निवडणुकीत!
सदोदित मते घेण्याचा विद्वन्मार्ग त्यांना अमान्य असतो.
मतचर्चेची जबाबदारी विद्वानांवर वा कायद्यांवर सोपवून

राजकारणी त्वरेने देशोद्धारास लागतात.
देशप्रेमी असतात फक्त राजकारणी;
हेही आता ठरून गेलेलेच आहे.
विद्वानांनी त्यावर वाद घेऊ नये.

मार्च, ७५

## या देशातील नवश्रीमंतांनी

या देशातील नवश्रीमंतांनी
चार घास कमी खाल्ल्याशिवाय
गरिबांना जगता येणार नाही
हे यांना कळायला
काळाने आणखी
किती पावले टाकली पाहिजेत !

यांच्या प्रतिवार्षिक अर्थसंकल्पाच्या
पावलागणिक एक एक
पाप पेरले जातेय
हे यांना कळायला
काळाने आणखी
किती पावले टाकली पाहिजेत !

यांच्या निर्बीज प्रयत्नांतून
विकासाची खुडलेली रोपे
या युगात पालवणार नाहीत
हे यांना कळायला
काळाने आणखी
किती पावले टाकली पाहिजेत !

काळालाही, आता कुठे थांबावे
हे कळण्यासाठी
काळाने आणखी
किती पावले टाकली पाहिजेत !

एप्रिल, ७५

## वाट पहा !

माझ्या प्रिय तरुण मित्रांनो,
दंगे कसले करता आपल्या मागण्यांसाठी ?
जरा वाट पहा मोठ्यांची मने द्रवण्यासाठी !
वाट पाहणे
हा कलियुगाचा स्थायिभाव आहे.
या देशात तर हे फारच खरे आहे.
येथिल नागरिकांना
वाट पाहावी लागते अन्नासाठी, वस्त्रांसाठी
अंथरुणावरल्या अभाग्यांना औषधासाठी;
नोकरीसाठी,
नोकरीतल्या न्याय्य वेतनासाठी, बोनससाठी,
वरच्या जागी पोचण्यासाठी, मोठे होण्यासाठी.
तुम्हाला तुमचे हवे आहे ? वाट पहा !
तुम्हाला मोठे व्हायचे आहे ? वाट पहा !
तुम्हाला मंत्री व्हायचे आहे ? वाट पहा !
मंत्री होण्यासाठी उलटावी लागते साठी.
कारण
या देशाला म्हाताऱ्यांचेच राज्य मान्य आहे.

मे, ७५

# मुकेने वाकलेल्यांना

निष्ठावान नागरिकांनो
भूऽक भूऽक ओरडता काय ?
सागरमार्गे येत्या संकटाची
तुम्हांस क्षिती नाही काय ?
देश एवढ्या संकटात असता
बोनस, वेतन कसचे मागता ?
संकटांच्या असता एवढ्या राशी
आणीबाणी काढणार कशी ?

काळ आता बदलला आहे
अणूयुगात चालला आहे...

सांगा भुकेने वाकलेल्यांना :
'आर्यभट' पाहून ताठ बना.
भुकेचे हे आवरून रडे
'अणुस्फोटा'चे गा पोवाडे.
परग्रहांवर लावण्या झेंडे
सरकार आता गुंतले आहे.
तुमच्या पोटाचे तुम्हीच बघा—
सरकार वेगळ्याच काळजीत आहे.

मे, ७५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

# प्रवाशांच्या गैरसोयीबद्दल

थकले-काळवंडलेले चेहरे, चिकचिकलेले अंग
सकाळच्या इस्त्रीच्या कपड्यांचे बदललेले रंग
स्टेशनच्या वारुळाकडे वाहणाऱ्या लांब लांब रांगा
गाड्यांच्या भोवती घोंघावणारे गर्दीचे लोळ
इंडिकेटर्सच्या विजेरी शब्दांकडे रोखलेले हजारो डोळे
आली गाडी आली गाडी वेडीवाकडी पळापळ.

"कृपा करून उतारूंना प्रथम उतरू द्या!"

चढणाऱ्या-उतरणाऱ्यांची लढाऊ झुंबड...
माणसांवर माणसे त्यांवर माणसे
माणसांच्या पायांशी माणसे...माणसे
उभे रहायला मिळाल्याचा आनंद
बसणाऱ्याचा त्याहून मोठा आनंद
खिडकीशी पोचणाऱ्याच्या भाग्याचे कौतुक...
घामाच्या धारांनी गाडी सुटण्याची वाट बघावी.

"...क्रमांकावरील गाडी नादुरुस्त असून...!"

गाडीगच्च गर्दीची जीवघेणी धावपळ...पुन्हा नवी उमेद...
नवी लढाई...नव्यांचा विजय...आनंद...पराजय.

"प्रवाशांच्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत!"

ही सरकारी वाऱ्याची झुळूक.
मेलेल्या चेहऱ्यांवरील राक्षसी हसू.
तरीही आम्ही अजून जगून आहोत
हे सारे श्रेय सरकारचे आहे!

जून, ७५

# गर्दी वाढल्यानेच

गर्दी वाढल्यानेच नगरांना महानगरांचे रूप येते
महानगरांना गर्दीमुळेच मोठेपण मिळत जाते.
जमा मोठी, खर्च मोठे, घरे मोठी, रस्ते मोठे,
रांगा मोठ्या, प्रश्न मोठे, उत्तरे मोठी, दंगे मोठे
महानगरांचे सारेच मोठे, मोठे असतात त्यांचे नेते
मोठेपणानेच त्यांच्या हाती देशाचेही नेतृत्व येते.
मोठेपणा टिकण्यासाठी गर्दीनेही टिकले पाहिजे,
हे स्थान टिकण्यासाठीच गर्दीनेही झटले पाहिजे.

नेत्यांना हे साधत असते; गर्दी त्यांना लाभत असते.
त्यांच्या इच्छांमुळेच केवळ गर्दी सारखी वाढत जाते.
महानगरांचे महाद्वार उघडतात येणाऱ्या प्रत्येकासाठी
येईल त्यास आपला म्हणतात आपल्यात ठेवून घेण्यासाठी.
त्याला सारे काही द्यावे : अन्न, वस्त्र, निवारा, नोकरी
वेळप्रसंगी घरच्यानेच तोडून द्यावी त्याला भाकरी.
गर्दीचा हा मूलमंत्र मतांसाठी पाळावाच लागतो.
गर्दीमुळेच गर्दीलाही समज यायला वेळ लागतो.

जून, ७५

## पुढाऱ्यांना वाटे

एकियाचे काम । दुसऱ्याचा घाम ।
तिसऱ्याचे नाम । होत जाई ॥
देशाच्या संसारी । नेते नर-नारी ।
बाकीचे भिकारी । रहावेत ॥
देवाजीला कळे । कोणा सांभाळावे ।
आपुलेचि बळे । सांगू नये ॥
पुढाऱ्यांना वाटे । तेचि खरे-खोटे ।
इतरांना कोठे । कळते हो ? ॥

जून, ७५

## आम्हा स्वतंत्रांना

आमच्या कल्पना बेहद्द साकार करणारे आम्ही
थिजलेल्या गलितगात्र आत्म्यांचे गुलाम.
न जाणो, न जाणले इतके ताणले गेल्यावर
जिभांवरून आमच्या वाहतील लाळांच्या लाटा.

भिजलेला प्रत्येक रजःकण रुजवणारे आम्ही
वाजवीपेक्षा व्याज घेऊन आतबट्ट्यात येणारे
पळताना पावलांना पळण्याचेच पेंव फुटते
तेव्हा मोकळ्या साऱ्या दिशा आम्हा स्वतंत्रांना.

नोंव्हेंबर, ७५

## अहो मी फॅसिस्ट

अहो मी फॅसिस्ट !
मला पकडा ! मारा !! झोडा !!!

कारण परवा मला भूक लागली
तेव्हापासून मी अन्न मागतोय.
ठरवलेला रस्ता केव्हाच चुकला
तरी मी अजून चालतोय.
चिडिचिप्प भावना पांघरून पहुडल्याहेत
तरी मी कविता लिहितोय.

मला पकडा ! मारा !! झोडा !!!
अहो मी फॅसिस्ट !

डिसेंबर, ७५

# हे चार क्षण

ओहो !
पाहिलेत ?
माझ्या आयुष्यातील आनंदाचे महान
हे चार क्षण !
ज्यांच्यासाठी जगण्याची ईर्षा ठेवली होती !!

हा पहिला,
मुंबईच्या गाडीगर्दीत मी एक मोकळा श्वास घेतला
दुसरा,
मी तिला आपले म्हणायचे ठरवले.
तिसरा,
आकाश स्वच्छ दिसले कुजबुजीविना.
चवथा,
मी त्याला ओळखले : तोही एक माणूसच.

मी आता संपायला सुरुवात करतोय.

डिसेंबर, ७५

# ही गळती थांबविण्यासाठी

मोकळ्या हवेशीर असतात खोल्या
तेव्हा आमचे आत्मे
तत्त्वनिष्ठांशी जखडलेले असतात.
आता
उन्हे आपला पसारा आवरून घेताहेत
अंधाराला जागा खाली करून द्यायला.
आता
आमच्या आत्म्यांची निष्ठा गळून पडतेय.
निष्ठांची तत्त्वपाउले गळून पडतायत.
आता
ही गळती थांबविण्यासाठी
अंधाराचे पूर्ण साम्राज्य
उभे राहण्याची वाट पहायला हवी.

फेब्रुवारी, ७६

## बोगद्यातील अंधारातून

आमची गाडी थोडी लेट होती तर
आम्ही आज नागडे असतो,
इथल्याच मातीत मोकळेपणी
खेळत, मूठ मूठ अंगावर उधळत.

कर्तव्याच्या कृत्रिम ओझ्यांनी वाकलो नसतो
अनीतीच्या फुका भारांनी थकलो नसतो
निदान बोगद्यातील अंधारातून
अजाणत्या वयातच पार झालो असतो.

आमची गाडी थोडी लेट होती तर
दाढीही फुटली नसती अपेक्षांची मुळे असलेली

मार्च, ७६

# काही सुराधारी शब्द

काही सुराधारी शब्द
माझ्याभोवती
घिरट्या घालताहेत.
त्यांचे हेतू पुरेसे स्पष्ट नाहीत;
तरी पण एक खरे,
त्यांची पाळत बरेच दिवस भोगतो आहे.
भयस्तंभाखाली
बराच काळ समाधी लावूनही
त्यांचे संशय संपत नाहीत.
नि अशा अशांत अनेक संध्याकाळी...

मार्च, ७६

## स्वार्थाच्या गजाआड

तुम्हा-आम्हाला थांबायला हवे
फुले फुलेस्तोवर.
सुवासासाठी.
सरकार शहाण्यांचे येईस्तोवर.
गाडीगर्दी सह्य होण्यासाठी.

आपण आपलेच बघायचे
हेच ज्यांचे ब्रीद
त्यांना डोंगराएवढ्या अडचणी.
सखेद सांगतोय
मिळणार नाहीये पिण्यासही पाणी.

करावे लागतील कराल
बैठे संप. सत्याग्रह. ठराव.
निःशस्त्र उठाव.
तुरुंगातील धान्याची फक्त
मागणी वाढवाल.
सरकार तुरुंगात असते
स्वार्थाच्या गजाआड.
सरकारच्या हातात बेड्या
स्वहिताच्या. पोलादी.

सरकार सदैव लढत असते.
सरकारशी. मागे होत्या त्या.
पुढे होईल त्या. भीतीपोटी.
सदैव टांगती तलवार.
निवडणुकांची. मृत्युवेदना. समोर.

सरकार कणखर असते.
सरकारला फितूर होता येत नाही.
नागरिकांशी. झगडणाऱ्या.
जगण्यासाठी.

फुले ही फुलतातच
रोपे खुडलेली नसली तर.
सुवासही येतोच
नाके खुडलेली नसली तर.

ऑक्टोबर, ७७

## उकडण्याला पर्याय नाही

दरवाजे उघडे टाकलेत
तर
छानसं वारं येईल.
वाऱ्याबरोबर
लाऊडस्पीकरमधून ओघळणारी
कर्कशगाणी.
धूर. पलीकडे कचरा जाळल्याचा.
भारताची महत्त्वाची संपत्ती
रसायन उद्योगाचा
अविस्मरणीय करपट वास.
रिक्षा-फटफटींचा
प्रेमाने वाढवलेला गडगडाट.
रस्त्यांवरील संभाषणे. दूषणे.
डाससंहारक उदबत्त्यांचा
विषवास.
हे नको असेल तर
दरवाजे बंदच ठेवा
मग उकडण्याला पर्याय नाही
मुंबईत.

ऑक्टोबर, ७७

## भावी

१.

ही गती आपल्याला अगतिक करण्यापूर्वीच
तिचा वेध घ्यायला हवा
वास्तवपूर्ण.
भावी काळ कालच्यापेक्षा आज
अधिक वेगाने जवळ येऊन भिडतोय
भयपूर्ण.
सारेच संकेत कोसळण्यापूर्वी आजूबाजूचा
आसमंत स्वच्छ पारखून घ्यायला हवा
जागृतपणे.
भावी काळ क्रूररूपे समोर उभा राहण्यापूर्वीच
त्याचे रूप समजून घ्यायला हवे
धीटपणे.
त्याचे रूप बदलणेही शक्य असते त्यामुळे.
उदंड तयारी व्हायला हवी आपली बदलण्यासाठी.

२.

वर्तमानाच्या शेजारील घरातच तो राहतो.
त्याची वाट निश्चित पण अगम्य.
त्याच्या अस्तित्वाच्या खुणा वास्तव पण धूसर.
पसरलेल्या कालौघावर तो ठामपणे ठिय्या देऊन.
प्रवाहाबरोबर वाहतोय वेगाने आपल्या दिशेने.
इतक्यात येईलच तो आपल्यापाशी.
दोन घरांत अंतर असे फारसे नाहीच.

३.

भावीकाळाचा स्वभाव ओळखूनच
त्याच्याशी वर्तन करणे बरे.
(कठीण असले तरी दुर्गम नाही हे.)
त्याच्या मनाच्या गाभ्यापर्यंत नेणाऱ्या
खुणा इतस्ततः विखुरल्याहेत.
(पाहणाऱ्याने पाहिले तरच उमगेल हे.)

मे, ७७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22360
वा. क्र. काव्य
2353
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0022360
REFBK-0022360

पहिली आवृत्ती : ७ डिसेंबर १९७७

© १९७७, रमेश पानसे

मूल्य तीन रुपये

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

प्रकाशक
अरुंधती पानसे
ऋचा प्रकाशन
सोनोरी, ३६ चरई
ठाणे ४०० ६०१

शब्दांचे अर्थ कसे बदलतात हे पाहावयाचे असेल तर नेता, पुढारी, आमदार, खुर्ची अशा अनेक शब्दांकडे पाहावे. आज हे शब्द त्यांच्या मूलभूत गंभीर अर्थाचा पक्ष सोडून विनोदी साहित्याच्या आश्रयास जाऊन राहिलेले दिसतात. त्यांच्या आधाराने निर्माण होत आहे हास्य. त्यांच्या आधारे उभे राहते भारतातल्या भ्रष्ट राजकारणाचे—समाजजीवनाचे चित्र. मनात दाटून येते चीड वा क्षोभ.

स्वातंत्र्य मिळाल्यावर सामान्य माणसाच्या मनात सुखी, समृद्ध व मानसिक दृष्ट्या निरोगी अशा जीवनाची अनेक स्वप्ने उभी राहिली. आज त्याच्या हातात उरल्या आहेत त्या झुंबरलेल्या स्वप्नांच्या काचा. त्याच्या ध्यानात येते आहे एक सत्य : आम्ही कुणीही नाही.

शब्दांचे अर्थ जसे बदलतात तसे काही शब्दांचे अर्थ गडदही होत जातात. उदाहरण हवे असल्यास पुढील शब्द गंभीरपणे पुन्हा वाचून बघा : आम्ही कुणीही नाही.

याच जीवनाचा लक्ष्यवेध रमेश पानसे यांनी या कवितांतून घेतलेला आहे. त्यांतून व्यक्त होणारी भावना त्यांची एकट्याची नाही. असंख्यांची आहे. अशी ही वर्तमानकलीन जीवनाची दशा दर्शविणारी कविता आहे. तिच्यातली उपरोध-उपहासाची धार आणि ती व्यक्त करणारा शब्दबंध ही मात्र रमेश पानसे यांची आहेत.